# परिणत होण्याचा ऋतू

१ सप्टेंबर, २०१८

आत्मीय वाचकांनो,

सप्टेंबरचा महिना—परिणत होण्याचा अर्थात रूपांतरित होण्याचा ऋतू! अधिक पूर्णत्वाने, अधिक दृढ निश्चयासह आणि आनंदाने स्वतःच्या सत्य स्वरूपात स्थित होण्याचा हा ऋतू आहे. निश्चितच निसर्गही कदाचित आपल्याला असेच काही सांगतो आहे, असे वाटते आहे. जगातील काही प्रदेशांत वसंतऋतूचे आगमन होते आहे, डोंगरदऱ्या तसेच ग्रामीण परिसर ताजा टवटवीत, हिरवागार व आशेने पूरित दिसू लागला आहे. अमेरिकेतील तसेच उत्तर गोलार्धाच्या काही प्रदेशांमधील ग्रीष्माचा बहर आता लवकरच शरद ऋतूत, त्या रंगांच्या भव्यतेत रूपांतरित होणार आहे जी भव्यता केवळ कालपरत्वे आणि विनम्रतेमुळे येताना दिसते — जी विनम्रता जन्माला येते चढउतार आणि सुखदुःखे यांच्यातून तावूनसुलाखून बाहेर पडल्यानंतर. आपण जगामध्ये कुठेही जरी असलो, तरी रूपांतरणाच्या उंबरठ्यावर आहोत.

या कालखंडाला असंख्य छटा आहेत; इतकेच नव्हे तर, यामध्ये एकाच वेळी उत्साहपूर्ण नावीन्यही असू शकते व त्याचबरोबर परिपक्व होत जाणेदेखील असू शकते, आणि परिपक्वता म्हणजे ‘ते’ बनणे जे आहे आणि जे सदासर्वकाळ ‘तेच’ होते — आणि हे अगदी योग्यच आहे. विविध प्रकारच्या रंगछटा आणि भावभावना मानवी अनुभवविश्वाला आणि साधनेच्या मूळ स्वभावालाच प्रतिबिंबित करत असतात. साधनेत आपल्या प्रगतीसाठी दोन्ही गोष्टींची आवश्यकता असते — नाविन्य आणि परिपक्वता, नवशिक्याची मानसिकता आणि ज्ञानाचा विकास व वृद्धी. या दोहोंच्या संघटनात संभावना निहित आहे, त्यात ओतप्रोत भरलेले सामर्थ्य आहे. त्यामध्ये गतिशीलता आहे.

या वर्षासाठी दिलेल्या संदेश प्रवचनात, गुरुमाई भारताच्या संतकवींविषयी आणि सत्संगाच्या त्या परंपरेविषयी शिकवितात, जिच्या निर्मितीसाठी या संतकवीनी योगदान दिले आहे — कशा प्रकारे त्या संतकवींनी त्यांच्या शब्दांमधून आणि कृत्यांमधून हे दाखवून दिले आहे की, सत्याचा अनुभव हा सर्वच लोकांना घेता येऊ शकतो. एक संतकवयित्री ज्यांच्याविषयी गुरुमाई बोलल्या होत्या त्या होत्या

लल्लेश्वरी, ज्या १४व्या शतकात काश्मिर येथे होऊन गेल्या. लल्लेश्वरी यांची स्फूर्तिदायक पदे आजदेखील आध्यात्मिक साधकांसाठी प्रेरणास्रोत बनून राहिली आहेत; सार्वत्रिकतेने अनुभवल्या जाणाऱ्या निजध्यासाच्या वा उत्कट इच्छेच्या भावनेला ही पदे काव्यरूप प्रदान करतात आणि शिकवणींना गेय रूप प्रदान करतात, जे त्या निजध्यासावर वा उत्कट इच्छेवर कार्य करण्यासाठी आपणास साहाय्य करतात. बाबा मुक्तानंदांनी लल्लेश्वरी यांच्या अनेक कवितांचे हिंदीत भाषांतर केले [ज्या कविता लल्लेश्वरींनी काश्मिरी भाषेत लिहिल्या होत्या], आणि बाबांनी केलेल्या हिंदी भाषांतराचे गुरुमाईंनी इंग्रजीत भाषांतर केले.

एका कवितेत लल्लेश्वरी लिहितात :

> तुम्ही जागृत आहात काय?
> मग पुढे पाऊल टाका.
> वेगाने चाला आणि आपली यात्रा पूर्ण करा.
> आपली समज वृद्धिंगत होण्यासाठी तुम्ही खूप काळजी घ्यायला हवी.[१]

किती उत्साहपूर्णता आहे लल्लेश्वरी यांच्या शब्दांमध्ये, त्यांच्या पाऊल पुढे टाका या आवाहनात नव्याने सुरुवात करण्याचा दृढनिश्चय आहे. त्याच वेळी, आपला प्रवास पूर्ण करण्यासाठी त्या आपल्याला प्रेरित करत आहेत — आपण यापूर्वीच ज्या गोष्टींची सुरुवात केली आहे त्यांना अंतिम स्वरूप देण्यासाठी आणि आतापर्यंत आपण जे यशस्वीरित्या पूर्ण केले आहे त्याची पूर्तता करण्यासाठी खंबीर, जलद आणि दृढ पावले उचलण्यासाठी.

गुरुमाई त्यांच्या संदेश प्रवचनात आपल्याला एक संकल्प पुढे घेऊन जाण्यास सांगतात; म्हणजेच आपल्या स्वतःच्या सत्संगाची रचना करणे आणि कोणत्याही प्राप्त क्षणी व स्थळी 'थांबणे आणि स्वतःला जोडणे' यासाठी. म्हणून, आरंभांच्या पूर्वतयारीचे काळजीपूर्वक भान ठेवत जेव्हा आपण २०१८च्या अंतिम चौमाहात प्रवेश करत आहोत, तेव्हा आपण हे पाहू की, या संकल्पाची पूर्तता करणे म्हणजे नेमके काय. २०१८च्या अखेरीस आपण स्वतःला साधनेच्या कुठल्या टप्प्यावर पाहू इच्छितो? आपल्या प्रवासाची सांगता किंवा त्याचा हा टप्पा कसा दिसतो आहे आणि आपण तिथे कसे पोहोचणार आहोत?

खरे सांगायचे तर, तुमच्या स्वतःच्या सत्संगाची निर्मिती करण्यासाठी कोणतीही शेवटची तारीख किंवा निर्दिष्ट सीमा नसते. सत्संग, सत्याच्या सान्निध्यात येणे, हेच साधनेचे नेमके सार आहे; त्याची महत्ता

कालातीत आहे, तुमच्या स्वतःच्या आत्म्याला तुमच्यासमोर प्रकट करण्याची त्याची क्षमता अमर्याद आहे. तरीदेखील, हे लाभदायक ठरेल की वर्षाच्या अखेरीस तुम्ही कुठे पोहोचू इच्छिता याविषयी *एखादा* उद्देश ठरवणे किंवा त्यासाठी काहीएक प्रमाण ठरवणे, आणि मग त्या ध्येयाचा पाठपुरावा प्रामाणिकपणे करण्यासाठी तुमच्याकडे अद्याप चार महिने आहेत — संपूर्ण चार महिने, त्या दिशेने प्रगती करण्यासाठी आश्वासनाने आणि संधीने परिपूर्ण असलेले. गुरुमाईंनी साधनेतील ध्येये गाठण्यासाठी 'छोटी, विशिष्ट, सुनियोजित' पावले उचलण्याविषयी शिकवले आहे. अशा प्रकारे, तुम्ही जे प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील आहात त्यासाठी तुम्ही अधिक सहजपणे योजना आखू शकता. तुम्ही तुमचे मन त्यामध्ये पूर्णपणे निमग्न करू शकता — आणि मग अधिक उत्साहपूर्णतेने तुम्ही ते करू शकता.

तेव्हा वर उपस्थित झालेल्या प्रश्नांविषयी विचार करा. *२०१८च्या अखेरीस तुम्ही कुठे असायला हवे असे तुम्हाला वाटते? जो संकल्प गुरुमाईंनी तुम्हाला दिला आहे त्याला पुढे घेऊन जाणे, याचा अर्थ काय असू शकतो?* कदाचित, तुमच्यासाठी या संकल्पाची पूर्तता करणे म्हणजे सत्संगाची रचना करण्यासाठी प्रत्यक्षात तुमच्या क्षमतेचा विकास करणे होय; म्हणजेच 'थांबणे आणि स्वतःला जोडून घेणे', याला स्वतःच्या अस्तित्वामध्ये इतक्या पुरतेपणाने भिनवणे, की तो अभ्यास श्वास घेणे व प्रश्वास बाहेर सोडणे यांच्याइतका सहज बनेल. कदाचित त्याचा अर्थ अगदी सखोलपणे हे जाणून घेणे असू शकते की, तुमची स्वतःची सत्संगती काय आहे आणि तुम्ही लोकांबरोबर असा किंवा एकटे, त्या संगतीशी तितक्याच सहजतेने संपर्क साधू शकणे. किंवा मग त्याचा अर्थ सत्संगाचा तो क्षण सातत्याने सजीव ठेवण्यासंबधी असू शकतो, जेणेकरून दिवसातील कार्यकलापांमध्ये मग्न असताना तुम्हाला स्वतःशी जोडलेले असण्याची अनुभूती अधिक निरंतरतेने घेता यावी.

तुमच्या अंतरंगात जे काही स्पंदित होते आहे, त्याच्याशी जोडले जा आणि त्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या आजूबाजूला आणि अंतरंगात, ज्या गोष्टींचा आरंभ नव्याने झाला आहे, त्या सर्व गोष्टींपासून प्रेरणा व ऊर्जा मिळवा. लल्लेश्वरी यांच्या शब्दांची दखल घ्या आणि कोणतीही जबरदस्ती न करता, कोणताही दबाव न आणता — तुमची समज वृद्धिंगत होऊ द्या. धैर्यासह, दृढतेने, निर्भयपणे एका अशा वातावरणाची निर्मिती करा की, ज्यामध्ये सत्संग, शिकवण आणि अनुभूती तुमच्या आत्म्यात चिरस्थायी आधार स्थापित करू शकतील.

नेहमीप्रमाणेच, सिद्धयोग मार्गाची वेबसाईट ही तुमच्या प्रयासांसाठी एक आधार आणि साधन असणार आहे. भारतामध्ये हा महिना, गणेशोत्सवाचा महिना आहे, जो भगवान श्रीगणेशाच्या सन्मानार्थ साजरा

केला जातो. भगवान गणेश विघ्नहर्ता आहे आणि नवआरंभाचा देव आहे. गणेशोत्सव यावर्षी सप्टेंबर महिन्याच्या १२ ते २३ या तारखांच्या दरम्यान साजरा होणार आहे [भारतात सप्टेंबरच्या १३ ते २३ या तारखांच्या दरम्यान]; या उत्सवादरम्यान भगवान गणेशाच्या उपस्थितीचे आवाहन तुम्हाला करता यावे म्हणून, वेबसाईटवर गणपती बाप्पाची स्तोत्रे वाचनाकरता आणि गायनाकरता उपलब्ध असतील. या बरोबरच गुरुमाईंच्या संदेशातील विषयांशी संबंधित काही गोष्टी प्रसारित केल्या जातील तसेच स्वामी अखंडानंद यांचे एक प्रवचन प्रसारित केले जाईल. हे प्रवचन बुद्धीचे तुमच्या साधनेतील महत्त्व या विषयावर असेल.

आणि जर यापूर्वी तुम्ही 'एक मधुर सरप्राइझ्' सत्संगात सहभागी झाले नसाल किंवा खास करून, तुम्ही त्यात यापूर्वी सहभागी झाले असलात, तरीही मी तुम्हाला या सत्संगात सहभागी होण्याकरता आणि गुरुमाईंचे संदेश प्रवचन ऐकण्याकरता प्रोत्साहित करेन. हा सत्संग ९ सप्टेंबरपर्यंत वेबसाईटवर उपलब्ध आहे. ज्या-ज्या वेळी तुम्ही यात सहभागी होता, त्या-त्या वेळी तुम्ही करत असलेला गुरुमाईंच्या शिकवणींचा शोधपूर्ण अभ्यास — याविषयी तुमचे आकलन की, तुम्ही कशाकडे वाटचाल करत आहात, तुम्ही कोणत्या मार्गावर आहात, अधिक सखोल, अधिक गहन आणि सूक्ष्मतम होत जातो.

अलीकडेच, लहान मुलांच्या आणि किशोरवयीन मुलांच्या समूहासमवेत गुरुमाई श्री मुक्तानंद आश्रमातील अमृतच्या कोर्टयार्डमध्ये होत्या. हे कोर्टयार्ड म्हणजे रंगांचा परिपूर्ण देखावा होता. कोर्टयार्डच्या एका बाजूला उंच अशा सूर्यफूलांच्या देठांचा पडदा तयार झालेला होता आणि त्याच्या इतर बाजूंना झाडेझुडूपे व लाल, केशरी, गुलाबी, पिवळ्या रंगांची फूले यांची नक्षीदार झालर तयार झालेली होती. सूर्योदय झालेला होता आणि त्याच्या तेजस्वी श्वेत प्रभेने सर्व काही आच्छादित केलेले होते.

मुलांसमवेत गुरुमाई सूर्यफूलांजवळ येऊन उभ्या राहताच एक फुलपाखरू त्यांच्या हातावर येऊन बसले. ते तिथे फक्त बसून राहिले — निश्चल, स्तब्ध, जणू त्याला याची खात्री नव्हती की, त्याच्या लांबट व बारीकशा पायांवर ते इंचभर जरी पुढे गेले, तर काय होईल.

काही वेळानंतर गुरुमाईंनी हलकेच त्या फुलपाखराला शेजारीच असलेल्या एका सूर्यफूलाच्या दिशेने ढकलले. त्या फूलाचा मऊ पृष्ठभाग आणि हृदयाच्या आकाराची मोठी पाने जणू काही त्याला खुलेपणाने आमंत्रित करत होते. तरीदेखील ते फुलपाखरू काही केल्या तिथून हलत नव्हते; गुरुमाईंचा हात सोडायला ते तयारच नव्हते. अतिशय मृदूलतेने गुरुमाईंनी त्याला आपल्या उघड्या तळव्याच्या पुढील बाजूस झुकवले आणि म्हटले, "जा. तू पकडू शकतोस. तू सशक्त आहेस."

फुलपाखराने त्यांचे म्हणणे ऐकले आणि अतिशय हळूवारपणे ते एका पानावर जाऊन बसले. आणि मग ते तिथेच बसून राहिले. सहजता आणि चिवटपणा एकत्रित होऊन तयार झालेली त्याची पकड त्याने पक्की बसवली. त्याने त्याचे पंख पसरले, सूर्यप्रकाशाला आत येऊ दिले आणि आपल्या पंखांवरील अलौकिक रंगबेरंगी आकृत्या प्रकट केल्या.

आपण गुरूंच्या शब्दांचे पालन जेव्हा करतो, तेव्हा जे घडते ते असामान्य असते — आपल्याला स्वतःच्या अंतरात सद्‌गुणांचा शोध लागतो, एकाएकी आपल्याला सामर्थ्य आणि सौंदर्य प्राप्त होते आणि आपण ते आपल्या जगतासमवेत वाटतो. सुरुवातीला या पत्रात मी लल्लेश्वरी यांच्या कवितेचा उल्लेख केला होता. त्या कवितेला आणखी एक कडवे आहे, जे नेहमीच आपल्याकरता महत्त्वपूर्ण आहे, पण कदाचित आत्ता या विशिष्ट, निर्णायक व परिवर्तनाच्या क्षणी आपण जेव्हा स्वतःला पाहत आहोत, तेव्हा ते खास करून महत्त्वपूर्ण आहे.

लल्लेश्वरी म्हणतात :

> तुमच्या ‘सहचराचा’ शोध घ्या,
> तुम्हाला प्रकाश दिसेल.
> तुमचे पाय अधिक बळकट होऊ द्या,
> आणि तुमचे पंख खुलू द्या.[२]

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

---

[१] *Lalleshwari: Spiritual Poems by a Great Siddha Yogini*, स्वामी मुक्तानंद यांच्याद्वारे अनुवादित, [साऊथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९८१], पृष्ठ ५.

[२] *Lalleshwari*, स्वामी मुक्तानंद यांच्याद्वारे अनुवादित, [साऊथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९८१], पृष्ठ ५.

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.